**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क्र. ७०/२०२६**
**श्रीमती बेबीताई कुशाबराव घायवाडे व १ –वि.– निरंक**
**आदेश नि. क्र. १ वर पारित**
**दिनांक २७/०७/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क्र. ३२/२०२२ दिनांक १०/०४/२०२६ रोजी निकाली काढण्यात आले. सदर प्रकरणातील आदेशानुसार गैरअर्जदार एच.डी.एफ.सी. अरगो जनरल इंश्युरन्स कंपनी यांनी रक्कम रुपये ३,१८,६४३/– (अक्षरी रूपये तिन लाख अठरा हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) न्यायालयात जमा केली आहे, ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ श्रीमती बेबीताई कुशाबराव घायवाडे व अर्जदार क्र. २ मुनेश कुशाबराव घायवाडे, यांनी त्यांचे हिश्याची रक्कम मिळण्याकरीता सदर अर्ज केलेला आहे.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरण ३२/२०२२ मध्ये अर्जदाराने अर्जात नमुद केलेली रक्कम रुपये ३,१८,६४३/– (अक्षरी रूपये तिन लाख अठरा हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) ही U.T.R. No. HDFC0000240HDFCH01041088838 दिनांक ०५.०६.२०२६ नुसार जमा असुन सदर रक्कम R-13/2026 दिनांक १५/०६/२०२६ नुसार जमा असल्याबाबतचा अहवाल नि. क्र. ५ अन्वये वरिष्ठ लिपीक (मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील झालेले नाही अथवा स्थगनादेश नाही असा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची पडताळणी केली असता अर्जदाराने प्रकरणांत आवश्यक असलेली कोर्ट फी भरली आहे. करीता मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. १ ते २ यांना खालील अटी व शर्तीवर रक्कम देणे योग्य होईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१.	मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. १ बेबीताई कुशाबराव घायवाडे यांना U.T.R. No. HDFC0000240HDFCH01041088838 मधे जमा असलेली रक्कम रू. ३,१८,६४३/- (अक्षरी रूपये तिन लाख अठरा हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) पैकी त्यांचे हिश्याची रक्कम रुपये २,५६,४६८/- (अक्षरी रूपये दोन लाख छप्पन हजार चारशे अडुसष्ट फक्त) एवढी देण्यात यावी. त्यापैकी रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी रूपये पन्नास हजार फक्त) दोन वर्षाकरीता अर्जदार बेबीताई कुशाबराव घायवाडे हिचे नावे तिचे सांगण्याप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवीमधे ठेवण्यात यावे. अर्जदार क्र.१ यांना त्यांची इच्छा असल्यास सदर मुदत ठेवीच्या रकमेवर जमा झालेले व्याज त्रैमासिक काढण्याची मुभा असेल. उर्वरीत रक्कम रुपये २,०६,४६८/- (अक्षरी रूपये दोन लाख सहा हजार चारशे अडुसष्ट फक्त) तिचे खात्यात पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी.

२.	मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. २ मुनेश कुशाबराव घायवाडे यांना U.T.R. No. HDFC0000240HDFCH01041088838 मधे जमा असलेली रक्कम रू. ३,१८,६४३/- (अक्षरी रूपये तिन लाख अठरा हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) पैकी त्यांचे हिश्याची रक्कम रुपये ६२,१७५/- (अक्षरी रूपये बासष्ट हजार एकशे पंचाहत्तर फक्त) एवढी त्यांचे खात्यात पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी. याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.07.27 17:18:01 +0530

(हिमंत भ. गायकवाड)

दिनांक: २७/०७/२०२६

अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा